पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ १७० /२०१४
दिनांक – १४/०२/२०१४

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक २०/०२/२०१४ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २०/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १८**

दिनांक :- २०/०२/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २०/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक ०५/०२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १७)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

**विषय क्र.१)** आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजनेनुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले आहे. सदरचे आरक्षण पिंपरी चिंचवड मनपा नियंत्रण क्षेत्रात येत आहे. या आरक्षणासाठी पोहच रस्ता ९ मीटर रुंदीचा आहे. हा ९ मीटर रुंदीचा रस्ता शाळेसाठी अरुंद असून अपुरा आहे. तसेच या आरक्षणामध्ये रहिवासी घरे, चर्च असून सुमारे ८० टक्के क्षेत्र इमारतीने व्यापलेले आहे. या शाळेच्या लगतच्या परिसरामध्ये सेंट उर्सुला हायस्कूल, ट्रिनिटी विद्यालय, सरस्वती विद्यालय, म्हाळसाकांत विद्यालय तसेच पिं.चिं.मनपाचे आकुर्डी शाळा आहे. तरी या आरक्षणानुसार आता शाळेची आवश्यकता नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे आरक्षण क्र.५४८ नुसार शाळेसाठी आरक्षित जागा आरक्षणामधून वगळून रहिवासी निवासी विभागात समाविष्ठ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक २०/०२/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २२० दिनांक ०८/०१/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९९५ च्या विकास आराखडयानुसार आकुर्डी येथील स.नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. सदर आरक्षण पिंपरी चिंचवड

महापालिकेच्या नियंत्रणामध्ये सन १९९७ पासून आलेले आहे. सदर आरक्षणामध्ये काही १९९५ व १९९७ पुर्वीची जुनी बांधकामे होती व नंतरच्या काळात देखील काही बांधकामे झालेली आहेत. या आरक्षणामध्ये १८ गुंठे जागा रिकामी असून इतर जागेत अनाधिकृत बांधकामे आहेत. १८ गुंठे रिकाम्या जागेचे भूसंपादन प्रक्रीया सुरु करणेस व ज्या जागेमध्ये बांधकामे झालेली आहेत ती जागा आरक्षणामधून वगळणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक २०/०२/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.३)** मोबाईल टॉवरची उभारणी व अनुषंगिक बाबींसाठी नवीन विनियम अंतर्भुत करण्याबाबत मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१ एए) ए अन्वये शासनाने प्रस्तावात नमुद संदर्भिय क्र.१ अन्वये नोटीस जाहीर केली आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सूचना प्रस्तावात नमुद संदर्भिय क्र.२ च्या पत्रान्वये पाठविण्यात आल्या असून त्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले आहेत. त्यानुसार सदरचे पत्र, शासन सुचना व हरकती / सुचनांवर अभिप्राय देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/ १७० /२०१४
दिनांक - १४/०२/२०१४

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.